*पोलिस उपनिरीक्षक छत्रपती चिडे यांच्या मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश*

*मृतकाच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन अर्थसहाय्य देणार*
=====================================================

नागभीड येथील पोलिस उपनिरीक्षक छत्रपती चिडे यांची अवैध दारू विक्रेत्यांनी केलेली हत्या ही अतिशय दुर्देवी घटना आहे. या घटनेमुळे चिडे कुटूंबियांवर जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्याची अनुभूती शासनाला आहे. शासन पूर्णपणे चिडे कुटूंबियांच्या पाठीशी असल्याचे अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शोकभावना व्यक्त करत म्हटले आहे.

छत्रपती चिडे यांच्या मुलाला तातडीने अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे निर्देश अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पोलिस अधिक्षकांना दिले असून मृतकाच्या कुटूंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन अर्थसहाय्य मिळण्याबाबत आपण मुख्यमंत्र्यांना विनंती करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या घटनेतील आरोपीला तातडीने पकडण्याचे निर्देश अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले असून प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष वकील नेमण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत.